Vol 6 Issue 6 Dec 2016
ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# मराठी भाषा संवाद : वक्तृत्व कौशल्य उपयोजनाचे महत्व

प्रा. डॉ. राजाराम राठोड
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर.

## प्रास्ताविक –

बोलणे सर्वांनाच प्रिय असते. चांगले बोलणे प्रभावित करते. बोलण्याने सुसंवाद आणि विसंवाद होतो. सुसंवादासाठी बोलणे ही एक महत्वाची क्रिया ठरू शकते. पण हे बोलणे तंत्रशुध्द आणि कौशल्यपूर्ण असेल तर त्याचे वेगळेपण जाणवते. अशा बोलण्याला वक्तृत्व असे म्हणता येईल. आधुनिक काळात संवादासाठी विविध माध्यमांचा वापर होतो आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर संवाद माध्यमे बदलत आहेत. त्याचे स्वरूप बदलत आहेत. या बदलाचा वेग वाढत आहे. मोबाईल आणि डी. टू. एच. सेवा, यासाठी इंटरनेटचा वापर, एल. टी. इ. (फोर जी) तंत्रज्ञान याच्या वापराने एकाच वेळी संवाद वेगवान, सोयीचा आणि त्याचवेळी गुंतागुंतीचा होतो आहे. अशा तंत्रविकासाच्या वेगवान टप्प्यावर वक्तृत्वाचे उपयोजन महत्वपूर्ण आणि अर्थप्राप्ती देणारे ठरत आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांचे जाळे वाढत आहे. या माध्यमाला चांगले बोलणाऱ्या मनुष्यबळाची आवश्यकता वाढत आहे. त्यामुळे चांगले, अभ्यासपूर्ण, कौशल्यपूर्ण, तंत्रशुध्द बोलणे अर्थप्राप्तीचे साधन बनत आहे. मराठी भाषाविषय घेऊन पदवी घेणारा विद्यार्थी याबाबतीत आपले भवितव्य घडवू शकतो.

## वक्तृत्व : शब्द व अर्थ

संस्कृत भाषेतील 'वक्तृ' या मूळ शब्दाशी 'वक्तृत्व' हा शब्द संबंधित आहे. वक्तृत्व शब्दाचा अर्थ भाषण, वाक्पटूता१ असा शब्दकोशात दिला आहे. इंग्रजी भाषेत यासाठी Elocution, Rhetoric,




Oratory हे पर्यायी शब्द आहेत. Elocution या शब्दाचा अर्थ स्पष्ट किंवा शुध्द बोलण्याची कला, भाषणकला, वक्तृत्वकला२ असा आहे. Rhetoric = लेखनात, भाषणात शब्दांची प्रभावी योजना, वक्तृत्वकलाय भाषेचा फुलोरा, शब्दावडंबर३ तर Oratory म्हणजे वक्तृत्वशैली४ होय.

विषयाचा–आशयाचा, शब्दाचा, संकल्पनांचा, विचारांचा अर्थ वाणीच्या द्वारे सुलभरीतीने श्रोत्यांसमोर स्पष्ट करणे. हे स्पष्ट करत असताना तर्क, तुलना, दृष्टांत, इतिहास, संस्कृती, पुराणे (प्राक्कथा), संदर्भांचा योग्य ठिकाणी, योग्य वेळी, सीमित वापर करून कथन तथा स्पष्टीकरण फुलवत नेणे अपेक्षित असते.

## वक्ता आणि श्रोता

वक्ता आणि श्रोता हे वक्तृत्वाचे अभिन्न अंग होत. वक्ता आणि श्रोता यांचे अद्वैत वक्तृत्वासाठी आवश्यक ठरते. श्रोत्याच्या श्रवण सक्रीयतेवर वक्तृत्व यशस्वी होते. वक्त्याचे श्रोतापरायण असणे आणि श्रोता बहुश्रुत असणे परिणामकारक संवादासाठी आवश्यक असते. वक्ता या शब्दाला इंग्रजी पर्यायी शब्द a speaker, orator असे आहेत. वक्तृत्वात श्रोत्याला महत्व आहे. 'वक्ता वक्ताची नोव्हे श्रोतेवीण' असे संत ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. त्यासाठी वक्ता हा विनयशील असावा. त्याने श्रोत्यांबद्दल आदरभाव ठेवावा हे अपेक्षित असते. वक्ता व श्रोता यांचे अद्वैत हे उत्कृष्ठ वक्तृत्वासाठी उपकारक ठरते.

यशस्वी वक्ता तोच, जो श्रोत्यांची अभिरुची लक्षात घेऊन समयसूचकतेने आपल्या वकृत्वात बदल करतो. 'किं करिष्यति वक्तः श्रोता यत्र न विधते' दृ जेथे श्रोते नसतील, तेथे वक्ता काय करेल? – What can speaker do when there is no audience ?५ वक्ता व श्रोता यांची सम साधल्याशिवाय निवेदन तथा निरुपण प्रभावी होत नाही. त्यासाठी वक्त्यांनी पूर्वतयारी करणे गरजेचे असते. वक्त्याचे भाषण श्रोत्यासाठी एक अपूर्व मेजवानी वाटली पाहिजे. त्यामध्ये ज्ञान, माहिती, मनोरंजन, विनोदचातुर्य, शहाणपण, हजरजबाबीपणा, बुद्धीचा तल्लखपणा, पांडित्य व विद्वतापूर्ण गोष्टींचे अपूर्व मिश्रण वाटले पाहिजे.६ श्रोत्याचे अवधान हे परीस धातुसारखे असते असे कलाकवी मुक्तेश्वरांनी आपल्या मुक्तेश्वरी महाभारत या ग्रंथात म्हटले आहे. या अवधानामुळे वक्त्याच्या लोहगुणरुपी वक्तृत्वाचे सोन्यात रुपांतर होते.

येथील श्रोते हे परिसणे तुमचे
अवधान परीस तेणे
माझे वक्तृत्व हे लोहगुण अमूल्य
होईल कांचन७

अशाप्रकारे श्रोत्याचे महत्व आहे. श्रोता हा पूर्वग्रहदूषित नसावा. वक्त्याने श्रोत्याला गृहीत धरू नये. त्याला न्यून समजू नये. सम पातळीवर येऊन संवाद साधावा. त्यामुळे योग्य परिणाम साधल्या जाईल.

## वक्तृत्व : व्याख्या

१. आपले विचार जोरदारपणे, स्पष्टपणे व योग्य शब्दध्वनींच्या माध्यमातून समोरच्या व्यक्तीच्या मनावर ठसविणे, याची परिणामकारक बोलणे किंवा वक्तृत्व यासाठी गरज असते.
२. सभेमध्ये आपले विचार स्पष्ट, मुद्देसूद, परिणामकारक, साभिनय व्यक्त करण्याच्या कलेला वक्तृत्व म्हणतात.
३. वक्तृत्व म्हणजे मुद्देसूद रीतीने परिणामकारकपणे व अस्खलित बोलण्याची कला.
४. वक्तृत्व म्हणजे भाषेवर प्रभुत्व, विचारांची चांगली जुळवाजुळव, भारदस्त शब्दयोजना, काही कोटीक्रम व सुभाषितांचा उपयोग.
५. वक्तृत्व म्हणजे दुसऱ्याचे मन वाणीच्या साधनाने आकर्षून हस्तगत करणे.
६. तंत्रशुध्द आणि कौशल्यपूर्ण बोलणे म्हणजे वक्तृत्व.

## वक्तृत्व : स्वरूप

संस्कृत सुभाषिताचा आधार घेऊन आपल्याला वक्तृत्वाचे महत्व

सांगता येते.

शतेषु जायते शूरः सहस्त्रेषु च पण्डितः
वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवति वा न वा

(अर्थ : शंभरात एखादा शूर निपजतो, हजारात एखादा पण्डित असतो. दहा हजारात एखादा खरा वक्ता असतोय परंतु दाता मात्र असतो का नाही याची शंकाच आहे.) शौर्य, पांडित्य यापेक्षा वक्तृत्व श्रेष्ठ असते पण शौर्य, पांडित्य या दोन्ही गुणांचा मिलाफ वक्तृत्वात असतो. वक्तृत्वातून काहीतरी चांगले सांगण्यासारखे असते. वक्तृत्वातून समूहाशी संवाद साधता येतो. वक्तृत्व हे शास्त्रही आहे आणि कलाही आहे. वक्तृत्वाची तंत्रे हस्तगत करणे हा शास्त्राचा भाग पण तांत्रिक भाषण वक्तृत्व होऊ शकत नाही. त्याला कलाकुसर आवश्यक असते. कला आवश्यक असते. ग्रीस देशातील विचारवंत डेमास्थिनेस हा प्रयत्नाने उत्तम वक्ता झाला. तो तोतरा, मुखदुर्बल होता. त्याला दम्याचा विकार होता. त्यावर मात करत जागतिक दर्जाचा तो वक्ता झाला. वक्तृत्व कला साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असते. वकील, शिक्षक, कीर्तनकार, प्रवचनकार, अभिनयपटू इत्यादिकांचे व्यवसाय बोलण्याशी पर्यायाने वक्तृत्वाशी जोडल्या गेले आहेत. वक्तृत्वातून समाजमन व देशाचे मन घडविता येते. अब्राहम लिंकन, म. गांधी, चर्चिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदि समाजसुधारकांनी वक्तृत्वातून परिवर्तनाचा यज्ञ मांडला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील भाषणे आजही संस्मरणीय आहे. स्वामी विवेकानंदानी आपल्या अभ्यासपूर्ण वाणीने जगाला प्रभावित केले. आज निवडणुकीत वक्तृत्वाचा प्रभाव दिसून येतो. विधिमंडळ, संसदेत लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी वक्तृत्वाचा परिणामकारक उपयोग होताना दिसतो. धार्मिक उपदेशासाठी वक्तृत्वाचा वापर प्राचीन काळापासून होतो आहे. व्यापार उद्देशासाठी वक्तृत्व लाभदायी आहे. मतपरिवर्तनाचे मोठे कार्य वक्तृत्वातून साधता येते. चांगले वक्तृत्व समाजमनाला दिशा देण्याचे कार्य करते.

## वक्तृत्व : उपयोजन

बोलणे जर व्यक्तींच्या छोट्या – मोठ्या समूहासमोर असेल तर त्याचे स्वरूप औपचारिक राहत नाही. त्याचा विषय ठरलेला असतो. हा विषय बोलणाऱ्या व्यक्तीला बराच आधी कळलेला असतो. बोलाण्यासाठीचा कालावधी, वेळ निश्चित असतो. अशा औपचारिक बोलण्याला वक्तृत्व असे म्हणता येईल. त्यासाठी श्रोत्यांच्या समूहाचा आवाका लक्षात घ्यावा लागतो. वक्तृत्वाचे उपयोजन करताना ठरलेल्या विषयाचा अभ्यास करावा लागतो. त्या विषयाची आजच्या परीप्रेक्षातील उपयोगिता व सैद्धांतिक स्वरूप समजून घ्यावे लागते. उपयोजन करताना ध्येय – हेतू निश्चित करावे लागतात. उदा.– समाजप्रबोधन, समाज–उद्दीपन, मनोरंजन, प्रशिक्षण. हेतूबरोबरच स्थळ, सराव, साधनांचा वापर, आवाजाचे स्वरूप, श्रोत्यांचा सहभाग, बोलण्याचा ओघ, विचारांची मांडणी, श्रोत्यांचा वयोगट आदि बाबी वक्तृत्वाच्या उपायोजनात महत्वाच्या ठरतात. उपयोजना संदर्भात पुढील मुद्द्यांचा विचार करावा.

१. बहुश्रुतता असावी.
२. चौफेर वाचन असावे.
३. टिपणे, नोंदी असाव्यात.
४. वक्तृत्वाचा सराव आवश्यक ठरतो.
५. योग्य प्रसंगी योग्य साधनांचा प्रभावी वापर करावा. उदा.– ध्वनिक्षेपक, दृक्–श्राव्य साधने, एल.सी.डी. प्रोजेक्टर, कागद, पेन्सिल इ.
६. श्रोत्यावर काय परिणाम साधायचा याची निश्चिती करावी.
७. हेतू निश्चित करावेत. उदा.– माहिती देणे, शिकवने, प्रशिक्षण देणे, स्फूर्ती देणे, प्रवृत्त करणे, उत्साहित करणे, खात्री पटविणे, कल्पना विकणे, मन वळविणे, शोध घेणे, चर्चा करणे, करमणूक करणे, मन रिझविणे इ.
८. तीन भागात वक्तृत्वाची पूर्वतयारी करावी. – ओळख किंवा सुरुवात, मुख्य गाभा, सारांश, निष्कर्ष.
९. वक्तृत्व सूत्रबध्द करण्यासाठी क्रम ठरवावा.
१०. श्रोत्याचे लक्ष वेधण्यासाठी काही गोष्टींची गरज असते. उदा.– प्रश्न विचाराने, अवतरणे, उतार सादर करणे, छोटीसी कथा,प्रसंग,विनोद सांगणे, धक्कादायक सुरुवात करणे, स्थळ काळ याला अनुसरून ऐतिहासिक पार्श्वभूमी कथन करणे, चालू घडामोडीविषयी बोलणे इ.
११. वक्तृत्वात एकाविषयातून दुसऱ्या विषयात सहजच शिरायला हवे.
१२. प्रारंभी अवधान खेचण्यासाठी मुद्दा, विनोद, प्रात्यक्षिक इ. ची तयारी ठेवावी.
१३. नवीन मुद्द्याकडे वळण्यापूर्वी मागील मुद्द्याची उजळणी केली पाहिजे.
१४. मुद्द्यांचा श्रोत्यांच्या कलानुसार उपयोजन करावे.
१५. अनेक नाणावलेल्या वक्त्यांच्या भाषणाच्या ध्वनीफिती अथवा चित्रफिती मिळवून त्या अवधान देऊन ऐकाव्यात.

या सर्व बाबींमुळे वक्तृत्व फुलण्यास मदत होते.

## सारांश

'वाचनाने बहुश्रुतता येते, लेखनाने नेटकेपणा येतो आणि वक्तृत्वाने हजरजबाबीपणा येतो.' आंग्ल तत्त्वज्ञ फ्रान्सिस बेकन यांचं हे निरीक्षण किती मार्मिक आहे. याची प्रचीती वक्तृत्वाच्या संदर्भात महत्वाची ठरते. जेंव्हा आपण ज्ञान पचवायला शिकतो, ओठांवर खेळवायला शिकतो तेंव्हाच वाणीला परिणामकारकता लाभते.

## संदर्भ

१. कै. वा. गो. आपटे, मराठी शब्दरत्नाकर (सुधारित आवृत्ती ऑक्टोबर २००६), पृष्ठ क्र. ६०७.
२. रमेश वा. धोंगडे, इंग्रजी मराठी शब्दकोश (OXFORD)(फेब्रुवारी २००६), पृष्ठ क्र. २५२.
३. रमेश वा. धोंगडे, इंग्रजी मराठी शब्दकोश (OXFORD)(फेब्रुवारी २००६), पृष्ठ क्र. ६१४.
४. रमेश वा. धोंगडे, इंग्रजी मराठी शब्दकोश (OXFORD)(फेब्रुवारी २००६), पृष्ठ क्र. ५०८.
५. प्रा. उध्दव कोळपे , वक्तृत्व दृ एक साधना , पृष्ठ क्र. ४५
६. प्रा. उध्दव कोळपे , वक्तृत्व दृ एक साधना , पृष्ठ क्र. ४६
७. ल. रा. नासिराबादकर , प्राचीन मराठी वांङ्मयाचा इतिहास (सहावी सुधारित आवृत्ती, ६ सप्टेंबर १९९७), पृष्ठ क्र. १२०



प्रा. डॉ. राजाराम राठोड
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org